भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०३/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन क्षुल्लक कारणावरुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०३/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील सहा आरोपीतांनी बेकायदेशीर गैरकायदयाची मंडळी जमवुन देव्हाळा बुज. येथील आठवडी बाजारातुन व्यापाऱ्याकडुन पैसे मागण्याचे कारणा वरुन फिर्यादी महादेव वासुदेव फुसे वय ५१ वर्ष, नरसींगटोला यांचे उजवे डोळयाचे वर काठीने मारुन जखमी केल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १४३,१४७,३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पो. स्टे. करडी हे करीत आहेत

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याचि ठण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०३/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आटा चक्की येथे काम करीत असतांना यातील दोन्ही आरोपी हे तेथे येवुन विनाकारन बॅक कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली त्यामुळे फिर्यादीचे दुकानातुन ग्राहक उठुन गेले असता फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली तेव्हा फिर्यादीचा काके भाऊ व काका यांना जिवाने मारण्याचि ठण्याची धमकी दिली फिर्यादी आपले घरी जात असतांना गणेश महादेव नगरकर इंडीयन गॅस च्या बाजुला फिरत असतांना तेथे सुध्दा आरोपीतांनी अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादी शकीर बब्बु पठाण वय ३० वर्ष, रा. स्टेट बॅक चे मागे शिवाजी वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) बाल कामगार प्रतीबंधक अधिनियमानुसार बालक विटा भट्टीवर काम करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०३/२०१७ चे १३.०० ते १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपले कामगार कृतीदल सोबत आरोपी यांचे विटा भट्टीवर धाड घातली असता २ बालक १) सुनिलकुमार झबुलाल कृतलहरे वय १३ वर्ष, २) शिलनकुमार लहाराम कृतलहरे वय १६ वर्ष, वय १६ वर्ष, दोन्ही रा. फानगाव ता+पानारी जि. बदोडा बाजार छ. ग. हे कामगार विटा भट्टीवर काम करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी उज्वल सुभाषचंद्र लोया वय ३२ वर्ष, रा. मोटवानी हाऊस सुभाष चौक गणेश नगर गोदिंया ह. मु. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३,३(अ)बाल कामगार प्रतीबंधक अधीनीयम १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १६/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

PSI
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.